RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ३३] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १३-१९, २०२६/श्रावण २२-२८, शके १९४८ [ पृष्ठे २४, किंमत : रुपये १६.००

### प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mumbai 400 032, dated 22nd June 2026.

*NOTIFICATION*

No. SPP. 2026/U.O.R.42/D-XIV.—In exercise of the powers conferred by proviso to section 8(*1*) of the Maharashtra Control of Organised Crime Act, 1999, the Government of Maharashtra hereby appoint Adv. Abhayraj D. Arikar as “Special Public Prosecutor” for conduction trial in RC 10 (E)/2004 of EOU-VI (MCOCA Special Case No. 7/2005), RC 062004 of EOU-VII (MCOCA Special Case 6/2005), and RC 11(E)/2004, of EOU-VII (MCOCA Special Case No. 3/2005) Under MCOCA Act, pending before various Criminal Courts in the State of Maharashtra and also for other matters arising out of these cases in revisional or Appellate Courts established by Law.

2. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

3. The Government reserves the right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. KUNWARSINGH R. SINGHEL,
Deputy Legal Advisor-*cum*-Deputy Secretary,
Law and Judiciary Department.

# विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कार्यालय

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एसआयए/सीआर-७४/२०२६.—ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) ( यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे ), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १० क मध्ये, अशी तरतूद केलेली आहे की, राज्य शासनास, लोकहितास्तव, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त कलम १० क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकल्पांना, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील स्थायी आदेश क्रमांक एसआए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२, दिनांक १७/११/२०२५ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम १०-क अन्वये प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्याचे शासनाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या जमिनींची उक्त कलम १० क च्या खंड ( च ) च्या व्याप्तीत येणाऱ्या आणि यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये नमूद केलेल्या प्रकल्पासाठी ( यात यापुढे ज्याचा निर्देश - "उक्त प्रकल्प" असा करण्यात आला आहे ) आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे विभागीय आयुक्त, नाशिक यांस दिसून आले आहे ;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्त, नाशिक याने उक्त प्रकल्पांकरिता केवळ निव्वळ जमिनीची आवश्यकता भासेल हे लक्षात घेऊन, प्रस्तावित संपादनासाठी उक्त जमिनींचे व्याप्तीक्षेत्र सुनिश्चित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्तास याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पास उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देणे, इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १० क आणि राज्य शासनाचे स्थायी आदेश क्रमांक एसआए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२, दिनांक १७/११/२०२५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, विभागीय आयुक्त, नाशिक याद्वारे, उक्त प्रकल्पास लोकहितास्तव, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देत आहे.

### अनुसूची - एक

जमिनींचा तपशील

गाव मेटघर किल्ला, तालुका त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | ९४ पै. | ०.०२५५ |
| २ | ९५ पै. | ०.०२५४ |
| ३ | ९६ पै. | ०.०२६४ |
| ४ | ११६ पै. | ०.०७८१ |
| | **एकूण क्षेत्र** | **०.१५५४** |

## अनुसूची - दोन

प्रकल्पाचे वर्णन

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचा उद्देश** | पायाभूत सुविधा |
| **प्रकल्पाचे नाव** | पेगलवाडी-ब्रम्हगिरी ( कि.मी. ०/००० ते कि.मी. ३/९३६ ) या क्षेत्रात रोपवेचे निर्माण करणे. |
| **प्रकल्पाचे वर्णन** | पेगलवाडी-ब्रम्हगिरी ( कि.मी. ०/००० ते कि.मी. ३/९३६ ) या क्षेत्रात रोपवेचे निर्माण करणे करीता. मौजे मेटघर किल्ला, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथील एकूण क्षेत्र ०.१५५४ हे.आर. भूसंपादन करण्याबाबत. |
| **जमीन संपादन करणाऱ्या अभिकरणाचा तपशील** | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ठिकाण : नाशिक,
दिनांक १६ जुलै २०२६.

**डॉ. प्रवीण गेडाम** ( भा.प्र.से. ),
विभागीय आयुक्त, नाशिक.

## OFFICE OF THE DIVISIONAL COMMISSIONER, NASHIK

*NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. SIA/SR-74/2026.—Whereas, section 10A of the Right to Fair Compensation And Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), (hereinafter referred to as ‘the said Act’) in its application to the State of Maharashtra, provides that the State Government may, in the public interest, by notification in the *Official Gazette*, exempt any of the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act ;

And whereas, as per Standing order No. SIA/2023/C.R.105/A-2, dated 17/11/2025 issued by the Revenue and Forest Department, Government of Maharashtra, the power of the State Government under section 10 A to grant exemption from application of the provisions of Chapter II and III of the said Act, have been delegated to the Divisional Commissioner ;

And whereas, it appears to the Divisional Commissioner, Nashik that the lands mentioned in Schedule I appended hereto are required or likely to be required for the project mentioned in the Schedule II appended hereto, which is covered under clause (f) of the said section 10A (hereinafter referred to as "the said project") ;

And whereas, the Divisional Commissioner, Nashik has ensured the extent of the said lands for the proposed acquisition being bare minimum land required for the said project ;

And whereas, the Divisional Commissioner, Nashik considers it expedient in the public interest to exempt the said project under section 10A of the said Act from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

Now, Therefore, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act, and Standing Order No. SIA/2023/C.R.105/A-2, dated 17/11/2025 issued by State Government and all other powers enabling it in that behalf, the Divisional Commissioner, Nashik hereby, in the public interest, exempts the said project from the application of provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

*Schedule -I*

Details of Land

Village Metgharkilla, Taluka Trimbakeshwar, District Nashik

| Sr. No. | Survey or Gat No. | Approximate Area of required Land (Hectare) |
|---|---|---|
| 1 | 94 p. | 0.0255 |
| 2 | 95 p. | 0.0254 |
| 3 | 96 p. | 0.0264 |
| 4 | 116 p. | 0.0781 |
| | **Total** | **0.1554** |

*Schedule -II*

Description of the Project

| Project Purpose | Infrastructure Project |
|---|---|
| Name of Project | For the Construction of ropeway in Pegalwadi-Brahmagiri (km. 0/000 to km. 3/936) area. |
| Description of project | Acquisition of 0.1554 hectare land for the construction of ropeway in Pegalwadi-Brahmagiri (km. 0/000 to km. 3/936) area. |
| Details of acquiring agency | Executive Engineer, Public Works Department (North Division), Nashik. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Place : Nashik,
Dated 16th July 2026.

Dr. PRAVEEN GEDAM (I.A.S.),
Divisional Commissioner, Nashik.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६२६ /क- १.—या सचिवालयातील श्रीमती सीमा स.तांबे, अवर सचिव यांची पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या 'उप सचिव' (वेतनस्तर एस-२५ : ७८८०० २०९२००) पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. श्रीमती तांबे यांना उप सचिव पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :—

(अ) सदर पदोन्नती रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यास 'उप सचिव' संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास श्रीमती तांबे यांना अवर सचिव पदावर पदावनत करण्याच्या अधीन सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) श्रीमती तांबे यांना सदर पदोन्नती उप सचिव पदावरील पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६२७ /क- १.—या सचिवालयातील कु. पुष्पा र दळवी, अवर सचिव यांची पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या उप सचिव (वेतनस्तर एस-२५ : ७८८००-२०९२००) पदावर तातपुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. कु. दळवी यांना उप सचिव पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहेः-

(अ) सदर पदोन्नती रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तातपुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तातपुरत्या पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यास ‘उप सचिव’ संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास कु. दळवी यांना अवर सचिव पदावर पदावनत करण्याच्या अधीन सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) कु. दळवी यांना सदर पदोन्नती उप सचिव पदावरील पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६२८ /क- १.—या सचिवालयातील श्री. घननीळ ज्ञा. देबडवार, अवर सचिव यांची पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या 'उप सचिव' (वेतनस्तर एस-२५ : ७८८०० - २०९२०० ) पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन -१६ - ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. श्री. देबडवार यांना उप सचिव पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :—

(अ) सदर पदोन्नती रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यास 'उप सचिव' संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास श्री. देबडवार यांना अवर सचिव पदावर पदावनत करण्याच्या अधीन सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६२९/क- १.—या सचिवालयातील पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या 'अवर सचिव' ( वेतनस्तर एस-२३ : ६७७०० २०८७०० ) पदावर श्री. विनोद ब.राठोड, श्री. कैलास रा. पाझारे, श्रीमती जयश्री प. म्हात्रे, अवर सचिव (समिती); श्री. जीवनकुमार अ. गांवकर, श्री. पवन प्र. म्हात्रे व श्रीमती नेहा हि. कोठारी, कक्ष अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात 'अवर सचिव' पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७ / २०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन -१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. संबंधित अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहेः-

(अ) सदर पदोन्नती अवर सचिव संवर्गात रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन झाल्यास त्यांच्यासाठी अवर सचिव संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठ अधिकाऱ्यास पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) श्रीमती म्हात्रे, अवर सचिव (समिती) व श्री. गांवकर, कक्ष अधिकारी यांना सदर पदोन्नती ही स्थायित्व प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६३०/ क-१.—या सचिवालयातील पदोन्नती / प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या 'अवर सचिव' (समिती) (वेतनस्तर एस-२३:६७७००-२०८७००) पदावर श्री. नितीन प्र. आहेर, श्री. रविंद्र म. मेस्त्री व श्रीमती अलका दे. पराडकर, कक्ष अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरुपात 'अवर सचिव' (समिती) पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७ / २०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन- १६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. संबंधित अधिकाऱ्यांना अवर सचिव (समिती) पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :—

(अ) सदर पदोन्नती अवर सचिव (समिती) संवर्गात रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन झाल्यास त्यांच्यासाठी अवर सचिव (समिती) संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठ अधिकाऱ्यास पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) श्री. रविंद्र म. मेस्त्री व श्रीमती अलका दे. पराडकर, कक्ष अधिकारी यांना सदर पदोन्नती ही स्थायित्त्व प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

क्रमांक १३६३१ /क-१.—या सचिवालयातील 'कक्ष अधिकारी' (गट-ब) (राजपत्रित) (वेतनस्तर एस-१७:४७६००-१५११००) संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यात रिक्त झालेल्या पदांवर सहायक कक्ष अधिकारी संवर्गात कार्यरत खालील कर्मचाऱ्यांना तद्‌र्थ पदोन्नती देण्यात येत आहे :—

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| (१) | श्रीमती जान्हवी सु. गमरे, सहायक कक्ष अधिकारी |
| (२) | श्री. दिनेश चं. तरे, सहायक कक्ष अधिकारी |
| (३) | श्री. संतोष दि. सुद्रिक, सहायक कक्ष अधिकारी |
| (४) | श्रीमती ज्योती शे. कामतेकर, सहायक कक्ष अधिकारी |
| (५) | श्रीमती शुभांगी चं. जगे, सहायक कक्ष अधिकारी |
| (६) | श्रीमती शीतल श्या. मोरे, सहायक कक्ष अधिकारी |

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांना कक्ष अधिकारी पदावरील तद्‌र्थ पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(अ) सदर पदोन्नती कक्ष अधिकारी संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांवर प्रशासकीय निकड म्हणून तद्‌र्थ स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तद्‌र्थ पदोन्नतीमुळे संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम सहायक कक्ष अधिकारी यांना पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(इ) सरळसेवेच्या कोट्यातील पदावर सरळसेवेने उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर या आदेशातील कनिष्ठ अधिकाऱ्यांना 'सहायक कक्ष अधिकारी' पदावर पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तद्‌र्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(फ) सदर तद्‌र्थ पदोन्नती सरळसेवच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यात येईपर्यंत किंवा प्रतिनियुक्तीवरील अधिकारी रुजू होईपर्यंत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीसाठी असेल.

(ग) सदर तद्‌र्थ पदोन्नती 'कक्ष अधिकारी' पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणारी विभागीय परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण होण्याच्या / सूट मिळण्याच्या व स्थायित्व प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन काकड,**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक ना. बँका / १-सआ/ नागपूर नागरिक बँक/का.क.१५६/२०२६ /९५०.—मी, नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून उक्त कलम १५६ ( १ ) अन्वये नागपूर नागरिक सहकारी बँक लि. ( मल्टीस्टेट बँक ) नागपूर या बहुराज्यीय सहकारी बँकेच्या प्रस्ताव दिनांक ०९/०१/२०१९ व दिनांक २५/०६/२०१९ अनुसार उक्त बँकेच्या खालील अधिका-यांस त्याच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी, सदर बँकेने बहुराज्यीय सहकारी बँकेत रुपांतरीत होणेपुर्वी वितरीत केलेल्या कर्जाची वसुली करणेसाठी, तसेच दादासाहेब रावळ को-ऑपरेटिव्ह बँक ऑफ दोंडाईचा लि., दोंडाईचा या बँकेच्या नागपूर नागरिक सहकारी बँक लि. ( मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक ) या बहुराज्यीय सहकारी बँकेमध्ये विलीन होण्यापूर्वीच्या अदा केलेल्या कर्ज प्रकरणाच्या वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ अनुसार वसुली अधिकाऱ्यामार्फत अंमलबजावणी करणेसाठी, कसूरदाराची मालमत्ता जप्त करून तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार खालील अटीस अधिन राहून दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | वसुली अधिकाऱ्याचे नाव | हुद्दा | प्रस्तावित कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | श्री. छत्रपाल रामसिंग राजपूत | कनिष्ठ अधिकारी | मुंबई |
| २ | श्री. प्रविण रामचंद्र पंडीत | वरिष्ठ अधिकारी | धुळे |
| ३ | श्री. रामेश्वर श्रीमंतराव कळमकर | सह. शाखा व्यवस्थापक | नंदूरबार/मुंबई/ धुळे |
| ४ | श्री. आनंद दत्तात्रय जगदाळे | शाखा व्यवस्थापक. | धुळे |

**अटी :—**

( १ ) वसुली अधिकारी यांना सदरचे अधिकार नागपूर नागरिक सहकारी बँक लि. ( मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक ) ही बँक बहुराज्यीय बँकेत रुपांतरीत होण्यापुर्वी उक्त बँकेने अदा केलेल्या कर्ज प्रकरणापुरते तसेच दादासाहेब रावळ को-ऑपरेटिव्ह बँक ऑफ दोंडाईचा लि. दोंडाईचा या बँकेच्या नागपूर नागरिक सहकारी बँक लि. ( मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक ) या बहुराज्यीय सहकारी बँकेमध्ये विलीन होण्यापूर्वीच्या अदा केलेल्या कर्ज प्रकरणापुरतेच वापरता येतील अन्यथा इतर प्रकारे सदर अधिकारांचा वापर करता येणार नाही.

( २ ) सदरचे अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरीता असतील.

( ३ ) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनूसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तत्काळ काढून घेण्यात येतील.

( ४ ) वसुली अधिकारी यांनी मालमत्तेच्या वाजवी किंमतीस ( अपसेट प्राईस ) निबंधकाची पूर्वमान्यता घेणे आणि मालमत्तेची विक्री कायम करणे याकामी या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ना. बँका/डी-४/अपसेट प्राईस व विक्री कायम /२०१५/८७०, दिनांक १७ एप्रिल २०१५ अनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-१ यांची मान्यता घ्यावी. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-१ यांनी उक्त बँकेच्या वाजवी किंमतीस ( अपसेट प्राईस ) पूर्वमान्यता देणे आणि मालमत्तेची विक्री कायम करणेसंबंधी प्रस्तावाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम, १०७ मधील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करावी.

( ५ ) वसुली अधिकारी यांनी दरमहा या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक २४ जून २०१६ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात अ-३, अ- ४, व ब कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सदर करावी.

( ६ ) प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(७) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँक विरूध्द महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(८) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

(९) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम, १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१०) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/प्र क्र २३१/१५ स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ०६/०६/२०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहोरेचा वापर करण्यात यावा.

(११) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, नागपूर नागरिक बँक लि. नागपूर (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)" असा फलक लावता येऊ शकेल.

(१२) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१३) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ अन्वयेचे आदेश दिनांक ०६/४/२०१८ मध्ये नमूद केलेप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(१४) या कार्यालयाचे आदेश / परिपत्रक दि. १/१/२०१७ मधील क्र. ४ कलम १५६ व नियम १०७ अन्वये वसुली अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही यामधील मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१५) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस आदेश/ यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या व आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१६) एका वसुली अधिकाऱ्याकडे १०० पेक्षा जास्त वसुली प्रकरणे देण्यात येऊ नयेत.

(१७) वसुली अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारांची उपरोक्त मुदत संपणेपूर्वी तीन महिनेचे आत अधिकाराचे नूतनीकरण करणेसाठीचा प्रस्ताव, नूतनीकरणाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश आज दिनांक १४ मे २०२६ रोजी माझे सहीशिक्केसह व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**नागनाथ यगलेवाड,**

अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक पतसंस्था/स.आ-५/का.क.१५६/श्री अग्रसेन सह पत मर्या. शेगांव/२०२६/१९१०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद भालेराव, अपर निबंधक ( पतसंस्था ), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे दि शेगांव श्री अग्रसेन सहकारी पतसंस्था मर्या., शेगांव जि. बुलढाणा या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी / कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) व नियम, १९६१ मधील नियम, १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दि. ३१/०३/२०२९ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अतुल मधुकर बिहाडे | मुख्य कार्यालय व्यवस्थापक | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |
| २ | श्री. इंद्रधन समाधान इंगोले | कनिष्ठ अधिकारी | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |
| ३ | श्री. रामेश्वर ओंकार भिसे | वसुली लिपिक | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |

**अटी :—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम, १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दर माहे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण - १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी ( महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम, १०७ अन्वये )" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, दि शेगांव श्री.. अग्रसेन सहकारी पतसंस्था मर्या., शेगांव, जि. बुलढाणा" असा फलक लावता येऊ शकेल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व दि.६.४.२०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हूकूमनाम्याच्या / वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या ( Cost of process ) दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय्य हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

११. वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१/१०/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

१३. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक यांनी प्रपत्र-४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास समक्ष सादर करावा.

**मिलिंद भालेराव,**
अपर निबंधक (पतसंस्था),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक ९ जुलै २०२६.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक पतसंस्था/स.आ-५/का.क.१५६/सोलापूर जि.मा.शि.व.से.सह.पत/२०२६/१८७०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद भालेराव, अपर निबंधक ( पतसंस्था, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या. बाळे, जि. सोलापूर या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यास त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी / कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) व नियम, १९६१ मधील नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दि. ३१/०३/२०२९ या कालावधीकरीता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दादासाहेब संभाजी जाधव | वसुली अधिकारी | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |

**अटी :—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनूसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरीता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दर माहे सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रपत्र १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधीत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी ( महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये ) " असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, जि.सोलापूर" असा फलक लावता येऊ शकेल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधीत कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व दि.६.४.२०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हूकूमनाम्याच्या / वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या ( Cost of process ) दराने वसुल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय्य हिशोब ठेवावयाचा असुन त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

११. वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१/१०/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसूलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमुद करावा.

१३. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक यांनी प्रपत्र-४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास समक्ष सादर करावा.

**मिलिंद भालेराव,**
अपर निबंधक (पतसंस्था),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक ७ जुलै २०२६.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक पतसंस्था/स.आ. ५/का.क.१५६/भेडसगांव ना.सह.पत. कोल्हापूर/२०२६/१८६५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद भालेराव, अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ; भेडसगांव नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भेडसगाव, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी / कर्ज वसुली करण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १९६१ मधील नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या दि. १/४/२०२६ ते दि. ३१/०३/२०२९ या कालावधी करीता प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रणजित मारुती पाटील | वसुली अधिकारी | वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या मंजूर कार्यक्षेत्रापुरते |

**अटी :—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त संस्थेच्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिताच असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रपत्र १,२,३, ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधीत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास व व या कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी. व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण - १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. या कार्यालयाकडील दिनांक ०६/०६/२०१९च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त आणि किंवा " सिव्हील कोर्ट", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी ( महाराष्ट्र सह, संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये ) " असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "भेडसगांव नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भेडसगांव, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर" असा फलक लावता येऊ शकेल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधीत कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व दि. ६.४.२०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हूकूमनाम्याच्या / वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या ( Cost of process ) दराने वसुल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय्य हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

११. वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१/१०/२०१८ व दिनांक ११/०७/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस / आदेश/ घोषणा पत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमुद करावा.

१३. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक यांनी प्रपत्र-४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास सादर करावा.

**मिलिंद भालेराव,**
अपर निबंधक ( पतसंस्था ),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक ७ जुलै, २०२६.

## THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

APPELLATE SIDE

I

No. A-3902/2026/315.—In view of the establishment of a Civil Judge, Senior Division Court at Akole, District Ahmednagar, the High Court has been pleased to make the transfer and posting of Shri G. D. Agrawal, 3rd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon, District Ahmednagar as Civil Judge, Senior Division, in the newly established Court at Akole, District Ahmednagar *w.e.f.* 22.02.2026.

II

The High Court has been further pleased to make the ranking of the Judicial Officers in the order as shown herein below :—

| | *Name and Present Posting* | *New Posting* |
|---|---|---|
| 1. | Smt. J. S. Kelkar, 4th Joint Civil Judge, Senior Division & Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon, District Ahmednagar. | 3rd Joint Civil Judge, Senior Division & Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon, District Ahmednagar *vice* Shri G. D. Agrawal transferred. |
| 2. | Shri D. M. Hinglajkar, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Akole, District Ahmednagar. | Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Akole, District Ahmednagar *vice* Shri A. R. Tengse. |
| 3. | Shri A. R. Tengse, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Akole, District Ahmednagar. | 2nd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Akole, District Ahmednagar. |

High Court, Bombay,
Dated 20th February, 2026.

SWAPNIL C. KHATI,
Registrar General.

## नागरी नेमणुका

**विभाग प्रमुख आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणुका, शक्ती आणि त्यांच्या इतर वैयक्तिक बाबी यासंबंधीचे आदेश शासनाकडून राजपत्राच्या या भागात अधिसूचनांच्या स्वरूपात प्रकाशित केले जातात ; त्यामुळे वरील बाबीसंबंधी सर्व संदर्भ निकालात निघाले आहेत असे समजण्यात यावे. अशा अधिसूचनांमुळे त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यमुक्ती व तत्सम बाबी यासंबंधी आनुषंगिक आदेश काढणे आवश्यक असल्यास राजपत्र मिळाल्यानंतर त्यांनीच ते काढले पाहिजेत. कारण शासनाकडून इतर कोणतेही आदेश काढले जाणार नाहीत.**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक सेनियो ३१२५/प्र.क्र. २२४/E-१५९९४०५/आस्था-१.— उच्च व तंत्र शिक्षण विभागातील श्री. संतोष पुनमचंद खोरगडे, सह सचिव हे दिनांक ३१ जुलै २०२६ (म. नं.) रोजी शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अशोक मांडे,**
शासनाचे उप सचिव.

---

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय (विस्तार), दुसरा मजला, दालन क्र. २२१, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑगस्ट २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक वैमाशा-२०२६/प्र.क्र. ५९/ग्रासं-३.—श्री. आ. आ. कुलकर्णी, उप नियंत्रक, जि. लातूर/धाराशिव हे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०(१) नुसार दिनांक ३१ जुलै २०२६ (म.नं.) रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**किरण देशपांडे,**
कक्ष अधिकारी.

---

## वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेनिवे-१४२६/प्र.क्र. ७६/प्रशासन-१.—श्रीमती निलम चंद्रशेखर राणे, कक्ष अधिकारी, वित्त विभाग ह्या दिनांक ३१ जुलै २०२६ (म.नं.) रोजी शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शुभांगी शिंदे,**
शासनाचे अवर सचिव.

————————

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेवानि-२०२६/प्र.क्र. २४/प्रशा.-२.—श्री. संजय औ. धारुरकर, उप सचिव, महसूल व वन विभाग, हे म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०(१) खालील तरतुदीनुसार दिनांक ३१ जुलै २०२६ (म.नं.) रोजी पासून नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास गायकवाड,**
शासनाचे सह सचिव.

————————

## संसदीय कार्य विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३१ जुलै २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेनिप्र-०८२५/प्र.क्र. १८५/पाच.— संसदीय कार्य विभागातील श्रीमती सुजाता प्रकाश तेरवणकर, कक्ष अधिकारी ह्या दिनांक ३१ जुलै २०२६ (मध्यान्होत्तर) पासून शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. सु. सोनार,**
कार्यासन अधिकारी.

## विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

३ रा मजला, ई विंग, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई ४०० ०१०, दिनांक २८ जुलै २०२६.

### अधिसूचना

क्रमांक राउआ-२०२६/आस्था-२ व ३/सेवा निवृत्ती/जुलै-२०२६/ब-८५२.—या कार्यालयाच्या संगणकिय सुचीप्रमाणे या विभागातील निम्ननिर्देशित राजपत्रित अधिकारी हे दिनांक ३१ जुलै २०२६ (म.नं) पासून नियत वयोमानानुसार शासन सेवेतून निवृत्त होत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | महाविकास सांकेतांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास शेषराव नागरगोजे | राज्यकर सहआयुक्त, लेखापरीक्षण-२, मुंबई. | MUM-AUD-F-०००२ |
| २ | श्री. अविनाश वि. भामरे-पाटील | राज्यकर सहआयुक्त, व्यवसायकर, नाशिक. | NAS-PTO-F-०००१ |
| ३ | श्री. सुनिल वसंतराव लहाने | राज्यकर सहआयुक्त, अपिले, अमरावती. | AMR-APP-F.०००१ |
| ४ | श्री. धनंजय दादासाहेब म्हस्के | राज्यकर उपायुक्त, नोडल-९, मुंबई. | MUM- NOD-E-०९०२ |
| ५ | श्री. गणेश गोपाळ वालावकर | राज्यकर अधिकारी, नोडल -३, मुंबई. | MUM-NOD-C-०३२० |
| ६ | श्री. संजय आनंदा चव्हाण | राज्यकर अधिकारी, नोडल, जळगांव. | JAG-NOD-C-००१५ |
| ७ | श्री. अनिल मधुकरराव पोटे | राज्यकर अधिकारी, नोडल-६, पुणे. | PUN-NOD-C-०६०३ |
| ८ | श्री. प्रदिप देविदास कुलकर्णी | राज्यकर अधिकारी, नोडल, नाशिक. | NAS-NOD-C-००१८ |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १३५ अन्वये, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची तारीख **शासकीय राजपत्रात** अधिसूचना देण्यासाठी, या कार्यालयाच्या स्तरावर सदर अधिसुचित, सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत फेरबदल झाल्यास ते बदल करण्याच्या अधीन राहुन सदर सुची निर्गमित करण्यात येत आहे.

संबंधित अधिकारी वरील दिनांकास प्रत्यक्षात शासकिय सेवेतून निवृत्त झाले किंवा त्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेत वाढ झाली किंवा कसे याची खात्री करून त्यांना कार्यमुक्त केल्याच्या कार्यवाहीचा अहवाल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रासहीत विनाविलंब या कार्यालयास पाठविण्यात यावा, जेनेकरुन त्यांच्या निवृत्तीची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करणे सुलभ होईल.

वरील अधिकाऱ्यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र व महाराष्ट्र कोषागार नियम २३६ चा दाखला (ना मागणी प्रमाणपत्र) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई व नागपूर-२ यांच्या कार्यालयास परस्पर पाठविण्यात यावा. तसेच जे अधिकारी शासकिय निवासस्थानात राहत असतील, त्यांच्या निवृत्तीबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयास कळवावे व आवश्यक दाखला मागवावा.

ज्या अधिकाऱ्यांबाबत महसूल हानी/विभागीय चौकशी कार्यवाही सुरु आहे किंवा प्रस्तावित आहे अशा अधिकाऱ्यांच्या प्रकरणी होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहून निवृत्ती वेतन लाभाची कार्यवाही करावी.

संबंधित अधिकाऱ्यांस नियमित सेवानिवृत्ती वेतन व सेवालाभ देण्यास काही कारणास्तव विलंब होणार असल्यास तात्पुरते निवृत्ती वेतन व सेवालाभ देण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १२६/१३० नुसार आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई व नागपूर -२ यांच्याकडून अंतिम निवृत्ती वेतन व सेवालाभाची रक्कम शक्य तितक्या लवकर मंजुर होईल, याबाबत कृपया आवश्यक कार्यवाही करावी.

**संजय शेटे,**
राज्यकर उपायुक्त (आस्थापना) २,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑगस्ट २०२६.

### अधिसूचना

क्रमांक File No. H.D.-54010/12/2026-MHD-(EXC-1) (E-1778096).—महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२, नियम १०(१) नुसार राज्य उत्पादन शुल्क विभागातील खालील निर्देशित निरीक्षक, (गट-ब) या संवर्गातील **राजपत्रित** अधिकारी त्यांचेसमोर नमूद दिनांकापासून (मध्यान्हनंतर) नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

| अ.क्र. | नाव | पदनाम व नियुक्तीचे ठिकाण | जन्मदिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रघुनाथ वा. कडवे | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, निलंगा-विभाग, लातुर. | ०६.०७.१९६८ | ३१.०७.२०२६ |
| २ | श्री. प्रविण भोईर | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, प्रशिक्षण केंद्र-१, आयुक्त कार्यालय, मुंबई. | २६.०७.१९६८ | ३१.०७.२०२६ |

२. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंग/विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही, सदर अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्ती आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुरज बेलेकर,**
कार्यासन अधिकारी.

————————

## गृह विभाग

दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ ऑगस्ट २०२६.

### अधिसूचना

क्रमांक डिपीपी-०७२६/प्र.क्र. १६०/पोल.-१०.—श्रीमती गीता यशोदिप गोडांबे, सहायक संचालक (प्रशासन), अभियोग संचालनालय, मुंबई या दिनांक ३० जून २०२६ (म.नं.) पासून नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र ना. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.